# महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ

(महाराष्ट्र शासन अंगिकृत)

**स्वारस्याची अभिव्यक्ती (Expression of Interest)**

महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळास औद्योगिक कारणांसाठी जमिनी विकसीत करणेसाठी महाराष्ट्रातील सर्व जिल्ह्यांमध्ये महाराष्ट्र औद्योगिक विकास अधिनियम १९६१ मधील भूसंपादन विषयक तरतुदींनुसार जमिनी संपादन करावयाच्या आहेत. जे जमिन मालक त्यांच्या जमिनी भूसंपादन प्रक्रियेव्दारे महामंडळास देण्यास इच्छुक आहेत अशा जमिन मालकांकडून विहीत नमुन्यात अर्ज व प्रस्ताव मागविण्यात येत आहेत. उपरोक्त विषयाबाबत अर्ज व प्रस्तावाबाबतचा तपशिल, अटि व शर्ती याबाबत माहिती महामंडळाच्या संकेत स्थळावर www.midcindia.org वर उपलब्ध आहे. जमिनमालक/अर्जदार यांनी त्यांचे परिपुर्ण प्रस्ताव संबंधीत प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांचे कार्यालयात या जाहिरातीच्या प्रसिध्दीच्या दिनांकापासून ६० दिवसात जमा करावेत.

दिनांक :- ०५/०५/२०२३
ठिकाण:- मुंबई

मुख्य कार्यकारी अधिकारी
महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, मुंबई-९३.

# महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ

(महाराष्ट्र शासन अंगिकृत)

**स्वारस्याची अभिव्यक्ती (Expression of Interest)**

**स्वारस्याची अभिव्यक्ती (Expression of Interest) अंतर्गत भूसंपादनासाठी जमीन देऊ इच्छिणाऱ्या जमीन मालकांनी करावयाच्या अर्जाचा नमुना.**

१) अर्जदार / अर्जदारांचे नाव

२) पत्ता

३) मोबाईल क्रमांक

४) संमती प्राप्त क्षेत्राचा तपशील

| अ.क्र. | गावाचे नाव | तालुका | जिल्हा | जमीन मालकाचे नाव | गट नंबर/ सर्वे नंबर | एकूण क्षेत्र | भोगवटदार वर्ग १ /वर्ग २ |
|---|---|---|---|---|---|---|---|

५) संमतीप्राप्त जमिनीबाबत फौजदारी / दिवाणी / महसुली दावा प्रलंबित असल्यास त्याचा तपशील.

| अ.क्र | गावाचे नाव | जमीन मालकाचे नाव | गट नंबर/ सर्वे नंबर | कोणत्या न्यायालयात दावा प्रलंबित आहे | दाव्याचा तपशील. | न्यायालयाचे आदेश |
|---|---|---|---|---|---|---|

**६) अटी व शर्ती**

१) प्रस्ताव सादर करण्यासाठी एक किंवा अनेक जमीन मालक यांची एकूण किमान १०० हेक्टर किंवा त्यापेक्षा जास्त जमिनीसाठी संमती प्राप्त असणे बंधनकारक आहे. त्यात बागायती, बिनशेती, दरीचे/डोंगराळ, तलाव/बंधारे इत्यादी क्षेत्र अंतर्भूत असु नये.

२) संमती प्राप्त जमिनींचा महसूली व कूळ कायद्यांच्या तरतुदीनुसार निर्विवाद मालकी हक्क असणे आवश्यक आहे.

३) संमतीप्राप्त क्षेत्रामध्ये पर्यावरण संवेदनशिल क्षेत्र, वनजमिनीचे क्षेत्र, Coastal Regulation Zone क्षेत्र, नदी लगतचे क्षेत्र, लाभक्षेत्र यांचा समावेश असु नये.

४) संमतीप्राप्त क्षेत्र प्रमुख जिल्हामार्ग, राज्यमार्ग, राष्ट्रीय महामार्ग यांचे लगत असणे आवश्यक आहे.

५) संमतीप्राप्त क्षेत्र कोणत्याही ऋणकोसाठी अथवा आर्थिक व्यवहार करणाऱ्यां कंपनीसाठी तारण ठेवलेले असता कामा नये.

६) संमतीप्राप्त क्षेत्राबाबत मऔवि अधिनियम १९६१ चे कलम ३३(२) नुसार संमतीदर्शक निवाडा घोषित झालेनंतर मोबदल्याच्या रक्कमेसंदर्भात कोणत्याही न्यायालयात दाद मागणार नसल्याबाबत प्रतिज्ञापत्र लिहून देणे आवश्यक आहे.

७) अर्जदाराने अर्ज केल्यानंतर सदर जमिनीची महामंडळाच्या आवश्यकतेनुसार व भूसंपादन विषयक विविध तरतुदींनुसार पाहणी करून व महामंडळाची उपयुक्तता तपासून जमीन संपादन करणे बाबत महामंडळाच्या स्तरावर निर्णय घेतला जाईल. सदर संपादनाची कार्यवाही महामंडळाच्या भूसंपादन विषयक प्रचलित कायदेशिर तरतुदीनुसार व कार्यपध्दतीनुसार करणेत येईल.

८) जाहिरातीच्या दिनांकापासून ६० दिवसात अर्जदारांनी त्यांचा परिपुर्ण प्रस्ताव संबंधीत प्रादेशिक कार्यालय येथे सादर करणे आवश्यक आहे.

९) महाराष्ट्र शासनाच्या विविध महामंडळांनाही स्वारस्याची अभिव्यक्ती (Expression of Interest) अंतर्गत अर्ज करता येईल.

१०) तसेच महाराष्ट्र शासनाच्या उद्योग,उर्जा व कामगार विभागाच्या दि.१६/०९/२०१९ च्या Package Scheme of Incentives २०१९ च्या शासन निर्णयातील मुद्दा क्रमांक १.३ मध्ये केलेल्या क्षेत्रांच्या वर्गीकरणानुसार गट ड+, उद्योग नसलेले जिल्हे (हिंगोली, गडचिरोली), नक्षलप्रभावित जिल्हे, महत्वाकांक्षी जिल्हे (Aspirational Districts) ( वाशिम, गडचिरोली, उस्मानाबाद, आणि नंदुरबार) तसेच सदर शासन निर्णयातील परिच्छेद २ मधील टेबल-१ व टेबल-२ नुसार विदर्भ, मराठवाडा, रत्नागिरी, सिंधुदूर्ग व धुळे या जिल्ह्यातील सर्व तालुक्यातील उद्योग घटकांना ड+ वर्गवारीतील उद्योग घटकांना अनुज्ञेय प्रोत्साहनांपेक्षा जास्तीची प्रोत्साहने अनुज्ञेय करणेत आली आहेत, या सर्व ठिकाणी किमान क्षेत्राची मर्यादा ५० हेक्टर राहील.

## अर्जासोबत सादर करावयाची आवश्यक कागदपत्रे

१) विहीत नमुन्यातील अर्ज.

२) अर्ज करण्याच्या महिन्यातील अद्ययावत ७/१२ उतारे.

३) नोंदणीकृत लॉ फर्म यांचेकडून संमतीप्राप्त क्षेत्राचा कायदेशीर शोध अहवाल.

४) संमती प्राप्त क्षेत्र, प्रमुख रस्ते, प्रमुख ठिकाणे इतर महत्त्वाच्या बाबी गुगल नकाशावर दर्शवून तयार केलेला रंगीत नकाशा.

५) १०० रू. स्टँम्प पेपरवर संमती प्राप्त जमिनीमालकांची भूसंपादन प्रक्रियेद्वारे जमिनी महामंडळास जमीन देऊ इच्छित असले बाबत संमती पत्रे.